पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती विशेष सभा**

कार्यपत्रिका क्रमांक - २१

**सभावृत्तांत**

दिनांक - **२१/०७/२०१५** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची विशेष सभा मंगळवार दिनांक **२१/०७/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.सभापती -** सभाकामकाजाचेवेळी सभाकामकाज उरकणेकामी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसलेने गुरुवार दिनांक **३०/०७/२०१५** रोजी दुपारी **२.४५** पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

----------

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती विशेष सभा**

कार्यपत्रिका क्रमांक - २१

**सभावृत्तांत**

( दिनांक २१/०७/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **३०/०७/२०१५** वेळ – दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती दिनांक २१/०७/२०१५ ची तहकूब विशेष सभा गुरुवार दिनांक **३०/०७/२०१५** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३) मा. वाबळे संजय मल्हारराव
४) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
६) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
७) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.बहाद्दरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा.प्रभाकर वाघेरे

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे दु:खद निधन झालेले असलेने त्यांना सभेत श्रध्दांजली वाहून शुक्रवार दिनांक ३१/०७/२०१५ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** शुक्रवार दिनांक ३१/०७/२०१५ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( पालांडे सुजाता सुनिल )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती विशेष सभा**

कार्यपत्रिका क्रमांक - २१

**सभावृत्तांत**

( दिनांक २१/०७/२०१५ व ३०/०७/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **३१/०७/२०१५** वेळ – दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची तहकूब विशेष सभा शुक्रवार दिनांक **३१/०७/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल** – **सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदाराव लोंढे
३) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – १०४ विषय क्रमांक – १
दिनांक – ३१/०७/२०१५ विभाग – प्रशासन
सुचक – मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा.विमलताई जगताप
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५९९/२०१५, दि.१४/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर “स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ” अभिनामाची ४ पदे पे बॅन्ड र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६००/- या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर असून सद्यस्थितीत रिक्त असलेले एक पद पदोन्नतीने भरणेकरीता दिनांक १७/०६/२०१५ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने “स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ” पदावर पदोन्नती देण्यासाठी अर्हताधारक “वैद्यकीय अधिकारी” पदावरील अधिका-याची शैक्षणीक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कलावधी इ. सेवाविषयक तपशिल पडताळून डॉ.जॉन वलसा सुनिल यांना खुला या प्रवर्गामधून “स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ” या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६००/- या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी

मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०५ विषय क्रमांक – २

दिनांक – ३१/०७/२०१५ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा.वसंत लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.इक्षेका/पापु/९/कावि/२९/२०१५, दि.१४/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.७ च-होली मधील चोविसावाडी या भागातील आरक्षण क्र.२/२५ हे पाण्याच्या उंच टाकीसाठी मनपाचे भागश: मंजूर विकास आराखडयामध्ये आहे. त्यापैकी पाण्याच्या टाकीसाठी ३१५२ चौ.मी.व रस्ता ३४८ चौ.मी. असे एकूण ३५०० चौ.मी. जागा मनपाचे ताब्यात मा.उपसंचालक नगररचना यांचे दिनांक ३१/०३/२०१२ चे पत्रान्वये घेण्यात आलेली आहे. आरक्षण क्र.२/२५ चे एकूण जागेपैकी साधारण ५०% जागा सद्यस्थितीत ताब्यात आलेली असल्याने सदरचे मनपाचे जागेवर अतिक्रमण होऊ नये या करीता या विभागाकडील (नि.नो.क्र.७/६९-२०१३-१४ नि.र.रु.१४,००,००२/-) सदरचे जागेस सिमाभिंत बांधण्याचे कामाचे आदेश दि.२१/०७/२०१४ अन्वये १२ महिने मुदतीने देण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत सदरची ५०% ताब्यात आलेल्या जमिनीवर सिमाभिंत बांधणेसाठी कुठलाही पाहोच रस्ता अस्तित्वात नाही. आरक्षित जागेपर्यंत जाणेसाठी रस्ता नसलेने ताब्यात आलेल्या ५०% जागेवर काम सुरु करता येत नाही. तरी सदरचे काम या ठिकाणी जाणेसाठी रस्ता झालेनंतर चालू करता येईल. तथापि मा.नगरसदस्य यांनी सदरचे काम सद्यस्थितीत च-होली येथील पाण्याची टाकीवर करावे असे सुचविले आहे. (चिंचवड देवस्थानच्या जागेवर या पूर्वीच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जुन्या टाकीजवळ मनपा मार्फत पाण्याची टाकी बांधणेत आलेली आहे) पाण्याची टाकीचे सुरक्षिततेच्या दृष्टीने सदरचे जागेवर म्हणजेच देवस्थानचे जागेत वर नमुद केल्याप्रमाणे चोविसावाडी ऐवजी च-होली टाकी येथे सिमाभिंत बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०६ विषय क्रमांक – ३

दिनांक – ३१/०७/२०१५

सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ – मा.अरुण बो-हाडे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -

मा.महापालिका सभा ठराव क्रमांक २८१२ दिनांक २०/०८/१९९४ अन्वये डॉ.एस.एस. गोरे, पशुधन विकास अधिकारी यांची सेवा सार्वजनिक हितासाठी महानगरपालिका अस्थापनेवर विलीन करणेत आलेली आहे. पशुवैद्यकीय विभागामध्ये " पशुवैद्यकीय अधिकारी " १९९८

पासून महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग-२ या श्रेणीमध्ये “शाखाप्रमुख” म्हणून कार्यरत आहेत. पशुवैद्यकीय अधिकारी यांचा खाजगी दवाखाना नाही अथवा ते खाजगी व्यवसाय करीत नसल्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील सर्व मेडिकल ऑफिसर्स यांना ज्याप्रमाणे व्यवसायरोध भत्ता दिला जातो त्या प्रमाणे नियमांनुसार पशुवैद्यकीय अधिकारी यांना व्यवसायरोध भत्ता सध्या देण्यात येत आहे आणि या पुढे देखील व्यवसायरोध भत्ता देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५८२/२०१५
दिनांक : ०१/०८/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Vidhi-14-15\proceeding 21_Vidhi.doc